अपी-2523

क्र. आस्थापना/अराप/शिपाई/ता.अ.ज्येसु/२०१५/
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई-३२,
दूरध्वनी:- २२०२९०८६, फॅक्स:- २२०२६८२६
ई-मेल:- diestt@maharashtra.gov.in
दिनांक:- 15 APR 2015

**विषय:- उद्योग संचालनालयांतर्गत मुख्यालय व मुंबई प्राधिकरण विभागातील "शिपाई" या संवर्गाची दि. ०१/०१/२०१५ पर्यंतची तात्पूरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत**

संदर्भ:- सा.प्र.वि, शा.नि क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/का-१२, दि. २१/१०/२०११

## परिपत्रक

उद्योग संचालनालयांतर्गत मुख्यालय व मुंबई प्राधिकरण विभागातील "शिपाई" या संवर्गाची दि. ०१/०१/२०१५ पर्यंतची तात्पूरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/३०/१२, दिनांक २१/१०/२०११ मधील सुचनांनुसार सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र 'अ' मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठता सूची मध्ये काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहिल्या असतील तर त्याबाबतची लेखी अभिवेदने संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रस्तुत परिपत्रक प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या कालावधीत योग्य त्या समर्थनासह उद्योग उप संचालक (आस्था) मुख्यालय, मुंबई यांना सादर करावीत. विहित मुदतीत कोणतेही आक्षेप आस्थापना शाखेस प्राप्त न झाल्यास संबंधितांचा काहीही आक्षेप नाही असे गृहीत धरुन ज्येष्ठतासूची अंतिम करण्यात येईल तसेच अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर **'शिपाई'** संवर्गाच्या ज्येष्ठता सूची बाबतचे परिपत्रक संचालनालयाच्या www.industry.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच ई-मेल वरती उपलब्ध आहे.

सहपत्र:- विहित प्रपत्र 'अ'

उद्योग सह संचालक (आस्था)
यांचे मान्यतेने

(वि.मु.सिरसाठ)
उद्योग उप संचालक (आस्थापना-१)

प्रत रवाना:-
१)अतिरिक्त उद्योग संचालक, मुख्य कार्यालय, मुंबई-३२.
२)उद्योग सह संचालक, मुं.प्रा.वि (मुंबई) (ई मेल द्वारे)
३) मुख्यालयातील सर्व शाखा (ई मेल द्वारे)

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र. २८४/१२, दिनांक २१.१०.२०११ सोबतचे प्रपत्र "अ"**
**उद्योग संचालनालयातील मुख्य कार्यालय व मुंबई प्राधिकरण विभागीतील "शिपाई" संवर्गात दिनांक १.१.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठतासुची**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | नांव | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे नियुक्त उमेदवाराचा गुणवत्ता क्रमांक व परिक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३४ | ३४ | श्री. गो.रा.भगत | खुला | ०९/५/१९८६ | १९/३/२०१३ | अनुकंपा तत्वावर | २६/९/२०१४ | ३१/५/१९४४ | एच.एस.सी | ** |

**सा.प्र.वि पत्र क्र. अकंपा/प्र.क्र.६९/१२/१४-अ, दि. ०७/३/२०१३ नुसार व संचालनालयाचे आदेश क्र. ३१ क्र.उसं/आस्था/लिटं/नियुक्ती/२०१३/सी-५२२, दि. ०८.४.२०१३ अन्वये लिपिक-टंकलेखक पदावर दि. १९.३.२०१३ अन्वये नियुक्ती करण्यात आली होती. टंकलेखन अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र व संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर न केल्याने त्यांच्या विनंतीनुसार आदेश क्र. उसं/आस्था/नियुक्ती/भगत/गट-ड/बी-८८, दि. २५.९.२०१४ अन्वये शिपाई, गट-ड पदावर नियुक्ती.

(वि.मु.सिरसाठ)
उद्योग उप संचालक (आस्था-१)